जा.क्र. डॉबासाकोकृवि/संशो-३/626 /२०२१
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली-४१५ ७१२, जिल्हा रत्नागिरी.
दिनांक : 09 MAR 2021

**विषय : संशोधन संचालनालयांतर्गत (PME Cell) करीता कंत्राटी पध्दतीने कामे करणेबाबत...**

संशोधन संचालनालय, दापोली अंतर्गत प्रकल्प अन्वेक्षण व मुल्यमापन कक्ष (Project Monitoring and Evaluation Cell) करीता कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कामे करण्यासाठी **दिनांक २३/०३/२०२१** पर्यत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ संशोधन सहाय्यक | बी. एस्सी, (कृषि, उद्यानविद्या, वनशास्त्र) | अंतर्गत गुणवत्ता तपासणी कक्षाबाबतची कामे करणे, वेगवेगळया बहीस्त अनुदानित संस्थांच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रकल्प सादर करणेबाबत माहिती तयार करणे आणि ती विद्यापीठांतर्गत सर्व शास्त्रज्ञांना पाठविणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, सामंजस्य करार तयार करणे, प्रकल्पांबाबतचा पत्रव्यवहार तयार करणे, विद्यापीठांतर्गत प्रकाशित होणाऱ्या प्रकल्पांबाबतची माहिती तसेच योजनांची माहिती संकेतस्थळावर सादर करणे, पॉवर पॉइंट प्रझेंटेशन तयार करणे, कार्यालयामध्ये लागणारी विविध प्रकारची माहिती विद्यापीठाच्या इतर संशोधन केंद्रावरुन फोन/ई-मेल ने मागवून घेऊन संकलीत करणे तसेच वरीष्ठांनी सांगितलेली इतर कामे करणे. |
| २. | लिपीक-नि-टंकलेखक | पदवीधर (कला, वाणिज्य, विज्ञान) किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण, मराठी टापपिंग ३० श. प्र. मि. आणि इंग्रजी टायपिंग ४० श. प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण, एम. एस. सी. आय. टी. अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या प्रकल्पांबाबत पत्रव्यवहार, खर्चाचा तपशिल, हिशोब तसेच, वेळोवेळी कृषि आयुक्तालय व शासनाकडून आलेली माहिती संकलीत करुन सादर करणे, मंत्रालय व कृषि आयुक्तालय यांनी आयोजित केलेल्या बैठकांसाठी माहिती टंकलीखीत करणे. बैठकीच्या इतिवृत्तावरील कार्यवाही संकलीत करुन सादर करणे, राष्ट्रीय कृषि विकास योजनेचे नविन प्रस्ताव Abstract संपूर्ण प्रकल्प अहवाल (DPR), पॉवर पॉइंट प्रझेंटेशन करण्यास मदत करणे, विद्यापीठांतर्गत सर्व संशोधन केंद्रे, महाविद्यालये, संशोधन योजनांचे प्रमुख यांच्याशी पत्रव्यवहार करणे, इतर बहिस्त संस्थांना सादर करावयाचे प्रकल्प अहवाल तयार करण्यास मदत करणे, प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी बैठका आयोजित करण्यास व त्यांचे इतिवृत्त तयार करण्यास मदत करणे, प्रकल्प व संशोधनाबाबत सर्व संशोधन केंद्राना केला जाणारा पत्रव्यवहार, मराठी व इंग्रजी टायपिंग, स्कॅन, फॅक्स, ई-मेल, तसेच वरीष्ठांनी सांगितलेली इतर कामे. |

**उपरोक्त पदे भरण्यासाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे :**

१. उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयोमर्यादा ही शासन धोरणानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ३८ वर्ष आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४२ वर्ष राहील.

२. सदर ठेका अकरा महिने कालावधीकरीता राहिल.

३. उमेदवाराचे संशोधन संचालनाल शाखेतील कामकाजाचे स्वरुप, कामाची उरक अणि अचूकता इ. बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता सदर ठेका रद्द करण्यात येईल.

४. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचीका क्र. एसएलपी-५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

५. दरपत्रक सादर करताना **प्रतिमहा एकत्रित दर** नमूद करावा.

६. दरपत्रक सादर करताना लिफाफ्यावर **PME Cell करीता ठेका पध्दतीने काम करण्याचे दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

७. वरील प्रमाणे ठेका पध्दतीने काम करण्यासाठी उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, टकंलेखन व संगणकीय कामकाजाचा अनुभव व इतर अर्हता याबाबतची कागदपत्र जोडून उपरोक्त कामे करण्यासाठी अपेक्षित **प्रतिमहा एकत्रित दर** नमूद करुन दरपत्रक **दिनांक २३/०३/२०२१** पर्यत निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयाकडे सायंकाळी ०५.३० वाजेपर्यत सादर करावेत. कामाचा अनुभव, सबंधीत विषयाचे ज्ञान आणि शैक्षणिक पात्रता या बाबी ठेका निश्चित करताना विचारात घेतल्या जातील.

**(प. म. हळदणकर)**
संशोधन संचालक

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) प्रमुख, कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र (AKMU), डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२/- त्यांना कळविण्यात येते की सदर नोटीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२) विद्यापीठ नोटीस बोर्ड

३) दापोली नगरपंचायत दापोली जि. रत्नागिरी

४) ग्रामपंचायत गिम्हवणे ता. दापोली जि. रत्नागिरी

५) ग्रामपंचायत जालगाव ता. दापोली जि. रत्नागिरी
२/- त्यांना कळविण्यात येते की सदर नोटीस आपल्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी.